आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१९ जून २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- खरीप हंगामासाठी केंद्रीय मंत्रीमंडळाची १४ पीकांच्या MSP ला मंजुरी, वाढवण बंदराच्या उभारणीलाही परवानगी
- देशाला २०४७ पर्यंत विकसित करण्यात ज्ञान महत्त्वाची भूमिका बजावेल, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं नालंदा विद्यापीठाच्या नवीन कॅम्पसच्या उद्घाटनप्रसंगी प्रतिपादन
- अर्थसंकल्पावर अर्थतज्ज्ञांच्या सूचना आणि सल्ला घेण्यासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली अर्थसंकल्पपूर्व बैठक संपन्न

**आणि**

- महिला क्रिकेटमध्ये बंगळुरू इथं सुरू असलेल्या सामन्यात भारताचं दक्षिण आफ्रिकेसमोर ३२५ धावांचं आव्हान

**<><><><><>**

खरीप हंगामासाठी १४ पीकांसाठीच्या MSP अर्थात किमान आधारभूत किंमतीला केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. उत्पादन खर्चाच्या तुलनेत ही किंमत किमान ५० टक्क्यांनी अधिक असेल याची खबरदारी घेतल्याचं माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. धान, कापूस, ज्वारी, नाचणी, बाजरी, मका, मूग, तूर, उडीद यासारख्या धान्यांचं किमान आधारभूत मूल्य मंत्रीमंडळानं आज मंजूर केलं. यामुळं शेतकऱ्यांना एकूण २ लाख कोटी रुपयांचा लाभ मिळेल, असं ते म्हणाले.

केंद्र सरकारनं आज पालघर जिल्ह्यातल्या वाढवण बंदराच्या उभारणीलाही मंजुरी दिली. हा निर्णय घेताना स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात विचारविनिमय करण्यात आला, तज्ज्ञांसह स्थानिकांचा सल्ला घेतला होता अशी माहिती वैष्णव

यांनी दिली. यासाठी ७६ हजार २०० कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे. यातून १२ लाख रोजगार निर्माण होतील, असं त्यांनी सांगितलं. सध्या देशात २० दशलक्ष TEU कं◌ंटेनर वाहून नेण्याची क्षमता आहे. या एकट्या बंदरात २३ दशलक्ष TEU कंटेनर वाहून नेण्याची क्षमता असल्याचं वैष्णव म्हणाले.

**<><><><><>**

२०४७ पर्यंत देशाला विकसित करण्यात ज्ञान महत्त्वाची भूमिका बजावेल, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. बिहारमधल्या राजगीर इथं नालंदा विद्यापीठाच्या नव्या कॅम्पसच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. भारतीय शिक्षण आणि ज्ञान पद्धती मजबूत करुन भारत सुपर पावर बनू शकतो. जगाला भारताची ओळख आणि परंपरेचं दर्शन घडवण्यासाठी नालंदा विद्यापीठ हे उत्तम उदाहरण असल्याचं ते म्हणाले.

शिक्षणाच्या क्षेत्रात जागतिक भागिदारी यामुळं तयार होत असल्याचं परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर म्हणाले. जागतिक सामंजस्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण आणि क्षमता विकास हे परिणामकारक मार्ग असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अर्थसंकल्पावर अर्थतज्ज्ञांच्या सूचना आणि सल्ला घेण्यासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं आज पहिली अर्थसंकल्पपूर्व बैठक संपन्न झाली. या बैठकीला केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, तसंच वित्त, आर्थिक व्यवहार, महसूल, वित्तीय सेवा आणि कॉर्पोरेट व्यवहार विभागांचे सचिव आणि मुख्य आर्थिक सल्लागार देखील उपस्थित होते.

**<><><><><>**

सिकलसेल आजाराशी संबंधित आव्हानांना तोंड देण्यासाठी केंद्र सरकार तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करत असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. आजच्या जागतिक सिकल सेल दिवसाच्या निमित्तानं समाजमाध्यमावरून दिलेल्या संदेशात या आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चारही त्यांनी केला आहे. या आजाराचं निदान आणि त्यावरील उपचार अशा विविध पैलूंवर सरकार काम करत असल्याचंही त्यांनी संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, या आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी त्याचं लवकर निदान करणं, उपचार करणं आणि रुग्णाची योग्य ती काळजी घेण्यासाठी आवश्यक ते उपाय करण्यावर भर दिला जात असल्याचं केंद्रीय आरोग्यमंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

सिकल सेल आजार हा फक्त काही विशिष्ट जमातीच्या लोकांना होत असल्याचा गैरसमज दूर करत सर्वसामान्य नागरिकांना या आजाराची माहिती करून  द्यायला हवी, असं मत केंद्रीय आदिवासी व्यवहार मंत्री जुएल ओराम यांनी आज व्यक्त केलं. नवी दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था-एम्स मध्ये सिकलसेल आजाराबाबत जागरुकता संमेलनात ते बोलत होते.

**<><><><><>**

केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी आज देशातल्या उष्णतेच्या लाटेची परिस्थिती आणि रुग्णालयांच्या तयारीचा आढावा घेतला. तसंच या रुग्णालयांमध्ये विशेष कक्ष निर्माण करण्याचे निर्देश दिले. राम मनोहर लोहिया रुग्णालयातील वैद्यकशास्त्राचे प्राध्यापक डॉ. अजय चौहान यांनी बातमीदारांना ही माहिती दिली.

उष्णतेच्या लाटेमुळं दिल्लीतल्या विविध रुग्णालयात सुमारे १८ जणांचा मृत्यू झाला आहे. उत्तर भारतातील उष्णतेच्या लाटेची परिस्थिती लक्षात घेऊन आरोग्य मंत्रालय नवीन धोरणांवर काम करत आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षात देशाच्या सामुद्रिक खाद्याच्या निर्यातीत तीन टक्क्याची वाढ झाल्याचं दिसून आलं असून या निर्यातीत आत्तापर्यंतची ही सर्वोच्च वाढ आहे. वाणिज्य आणि उद्योग विभागानं आज ही माहिती दिली. चालू वर्षातली निर्यात सुमारे १७ लाख ८१ हजार टन इतकी आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत निर्यातीची ही आकडेवारी सुमारे १७ लाख ३५ हजार टन इतकी होती.

**<><><><><>**

देशात कोळशापासून तयार होणाऱ्या ऊर्जेची मागणी यावर्षी ७ पूर्णांक ३ दशांश टक्के वाढली असून, देशातल्या औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये कोळशाचा मुबलक साठा असल्याचं कोळसा मंत्रालयानं म्हटलं आहे. औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये साडे चार कोटी टन इतका कोळसा उपलब्ध आहे. तर देशातला एकूण कोळसा साठा साडे चौदा कोटी मेट्रिक टनांहून अधिक असल्याचं कोळसा मंत्रालयानं सांगितलं आहे.

**<><><><><>**

संसद भवन संकुलातले प्रमुख नेत्यांचे पुतळे स्थलांतरित केल्याप्रकरणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांना पत्र लिहिलं आहे. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर राष्ट्रीय नेत्यांचे पुतळे संकुलातल्या मूळ ठिकाणी स्थलांतरित करावेत, अशी मागणी त्यांनी या पत्रात केली आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची विशेष मुलाखत उद्या सकाळी पावणे ९ वाजता आकाशवाणी गोल्डसह देशभरातल्या आकाशवाणी केंद्रांवरुन प्रसारित होईल. राष्ट्रपतींच्या वाढदिवसानिमित्त माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी ही मुलाखत घेतली आहे. आकाशवाणीचं युट्युब चॅनल आणि इतर सोशल मीडियावरही ही मुलाखत ऐकता येईल.

<><><><><>

दिल्ली उत्पादन शुल्क धोरणाशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात दिल्ली विशेष न्यायालयानं आज दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत ३ जुलैपर्यंत वाढ केली आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यानच्या तीन सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज  बंगळुरु इथं सुरू आहे. भारताने पहिल्यांदा फलंदाजी करताना ३ बळींच्या मोबदल्यात ३२५ धावा केल्या. शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या संघाने ४४ षटकात तीन बळींच्या मोबदल्यात २४४ धावा केल्या होत्या.

<><><><><>

तापमान वाढीचा परिणाम हज यात्रेकरूंवर झाला असून ५५० हून अधिक यात्रेकरूंना  आपले प्राण गमवावे लागले. उन्हाच्या कडाक्यानं ५० अंश सेलशियस चा  पारा ओलांडल्यानं इजिप्त मध्ये ३२० यात्रेकरूंचा मृत्यू झाला तर जॉर्डन इथे मृतांची संख्या ६० इतकी झाली.

<><><><><>

चीनमध्ये झालेल्या मुसळधार पाऊस,पूर आणि भूस्खलनासारख्या घटनांमध्ये किमान १३ जणांचा मृत्यू झाला. शंघान्ग इथे गेल्या २४ तासात सतत पाऊस पडत आहे. त्याचा परिणाम सुमारे साडे सहासष्ट हजार लोकांच्या जीवनावर पडला आहे. या घटनांमध्ये कित्येक लोक बेपत्ता झाले आहेत. दक्षिण चीन मध्ये देखील वातावरण तणावपूर्ण आहे.

<><><><><>

बांग्लादेशमध्ये झालेल्या भूस्खलनामुळे ९ लोकांचा मृत्यू झाला असून अनेक लोकवस्त्यांचं नुकसान झालं. कॉक्स बाजार जिल्ह्यात ही घटना घडली. इथे रोहिंग्या जमातीच्या ३३ वस्त्या असून या भागात कालपासून मुसळधार पाऊस पडत आहे. डोंगर उतारावरच्या नागरिकांचं स्थलांतर करण्यात येत आहे.

<><><><><>

चॅड या लहानशा देशाची राजधानी एन्जामेना इथं लष्करी दारुगोळा गोदामाला आग लागून त्यात ९ जणांचा मृत्यू झाला.

<><><><><>

आयसीसी टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आजपासून सुपर आठ संघांमधले सामने सुरू होणार आहेत. हे सर्व सामने वेस्ट इंडिज मध्ये खेळले जाणार आहे. यातला पहिला सामना आज अमेरिका आणि दक्षिण आफ्रिकेच्या संघांदरम्यान खेळ सुरु आहे. सुपर आठ फेरीतला भारताचा पहिला सामना उद्या अफगाणिस्तान बरोबर होणार आहे.

//<><><><><>//